# कृषि हवामान सल्ला पत्रक, पालघर जिल्हा

## ग्रामीण कृषि मौसम सेवा, जिल्हा कृषि हवामान केंद्र

## गोखले एज्युकेशन सोसायटी, कृषि विज्ञान केंद्र, कोसबाड हिल

अंक ०८ /२०२१ दिनांक : २५ /०१ /२०२१ कालावधी ५दिवस

| मागील हवामान आठवडा सारांश (दिनांक १९ /०१ /२०२० ते २५ /०१ /२०२१) सदर हवामान घटकांची नोंद भात संशोधन केंद्र, पालघर येथून घेण्यात आली आहे | | | | | | | हवामानाचे घटक | हवामान पूर्वानुमान (दिनांक २६ /०१ /२०२१ सकाळी ८:३० पासून ३० /०१ /२०२१ सकाळी ८:३० वाजेपर्यंत) | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १९/०१ | २०/०१ | २१/०१ | २२/०१ | २३/०१ | २४/०१ | २५/०१ | | २६/०१ | २७/०१ | २८/०१ | २९/०१ | ३०/०१ |
| ० | ० | ० | ० | ० | ० | ० | पाऊस (मिमी) | ० | ० | ० | ० | ० |
| २९ | ३२ | ३१.६ | ३१.२ | | | | कमाल तापमान (अं.से) | २६ | २६ | २६ | २७ | २८ |
| २०.४ | २० | १४.८ | १५ | | | | किमान तापमान (अं.से) | १६ | १५ | १५ | १५ | १६ |
| | | | | | | | मेघाच्छादन (ऑक्टा) | ढगाळ | अंशत ढगाळ | अंशत ढगाळ | स्वच्छ | स्वच्छ |
| ९० | ६२ | ७३ | ९० | | | | सकाळची सापेक्ष आर्द्रता | ७२ | ७० | ६८ | ७० | ७० |
| ५१ | ३७ | ४४ | - | | | | दुपारची सापेक्ष आर्द्रता | ६० | ५८ | ५५ | ५५ | ५४ |
| २.४ | ५.२ | ३.४ | २.६ | | | | वाऱ्याचा वेग(किमी/तास) | ६ | ६ | ६ | ८ | ६ |
| आ. पू | आ.पू | आ. द | - | | | | वाऱ्याची दिशा | ई.पू. | ई.पू. | ई.पू. | ई.पू. | ई.पू. |

| पाऊस (मिमी) मागील आठवड्यातील | पाऊस (मिमी) १/१/२०२१ पासून आजपर्यंत | पाऊस (मिमी) गेल्या वर्षीचा |
|---|---|---|
| ०.० | ०.० | ३११५.२ |

## हवामान आधारित कृषि सल्ला

| | |
|---|---|
| हवामान पूर्वानुमान | **प्रादेशिक हवामान विभाग मुंबई, द्वारे देण्यात आलेल्या अंदाजानुसार दिनांक २६ ते ३० जानेवारी, २०२१ दरम्यान कमाल व किमान तापमानात घट शक्यता वर्तवण्यात आली आहे. कमाल तापमान २६ ते २८ अंश सेल्सियस राहील व किमान तापमान १५ ते १६ अंश सेल्सियस राहील.** |
| सामान्य सल्ला | **किमान तापमानात घट होत असल्याने फळ बागेला संध्याकाळच्या वेळेस पाणी देण्याची व्यवस्था करावी तसेच जागोजागी पालापाचोळा पेटवून धूर करावा जेणेकरून बागेतील तापमान नियंत्रित राहण्यास मदत होईल.** |
| संदेश | **किमान तापमानात घट होत असल्याने रात्रीच्या वेळेस जनावरांच्या गोठयात तसेच कोंबड्यांच्या शेड मध्ये गरजेनुसार विजेचे बल्ब आणि शेडभोवती पडदे गुंडाळावे.** |

| पिक | अवस्था | कृषि सल्ला |
|---|---|---|
| उन्हाळी भात | पुर्नलागवड | उन्हाळी भात पिकांमध्ये तणाच्या बंदोबस्तासाठी ब्युटाक्लोर ५० ईसी हे तणनाशक १.५ किलो प्रति हेक्टर या प्रमाणात ५०० लिटर पाण्यात मिसळून भात लागणीनंतर एक आठवड्याच्या आत फवारणी करावी. तणनाशक फवारणीपूर्वी भात खाचरातील संपूर्ण पाणी काढून टाकावे व दुसऱ्या दिवशी पुन्हा पाणी शेतात भरावे. |

| | | |
|---|---|---|
| **हरभरा** | **फुलोरा अवस्था** | ➕ जिरायत हरभरा क्षेत्रात जमिनीतील ओलावा खूपच कमी असेल आणि एखादे पाणी देणे शक्य असेल तर हरभरा पिकाला फुले येऊ लागताच पाणी द्यावे. मध्यम जमिनीत ४५ ते ५० दिवसांनी दुसरे आणि ६५ ते ७० दिवसांनी तिसरे पाणी द्यावे. भारी जमिनीस पाण्याच्या दोनच पाळ्या पुरेशा होतात. त्यासाठी पहिले पाणी ३०-३५ दिवसांनी व दुसरे पाणी ६५-७० दिवसांनी द्यावे. |
| **केळी** | **वाढीची अवस्था** | ➕ केळी लागवडीनंतर दुसऱ्या व चौथ्या महिन्यात इडिटीए-जस्त आणि इडिटीए-लोह यांची प्रत्येकी ५० ग्रॅम १० लिटर पाण्यात मिसळून फवारणी करावी. तसेच, पाचव्या व सातव्या महिन्यात जमिनीमधून झिंक सल्फेट आणि फेरस सल्फेट प्रत्येकी १५ ग्रॅम प्रति झाड शेणखतात (१५० ग्रॅम) मुरवून वापरावे. |
| **सुपारी** | **वाढीची अवस्था** | ➕ सुपारी पिकाला जानेवारी महिन्यात खताचा दूसरा हप्ता १६० ग्रॅम युरिया + १२५ ग्रॅम म्यूरेट ऑफ पोटाश या प्रमाणात द्यावा. |
| **आंबा** | **मोहोर अवस्था** | ➕ आंबा पिकावर तीन फवारण्या देवून १५ दिवस झाले असल्यास थायमेथोकझम २५ डब्लु जी ०.१ ग्रॅम प्रति लिटर पाण्यात मिसळून फवारणी करावी.<br>➕ ढगाळ वातावरणामुळे मोहोरावर करपा रोगाचा प्रादुर्भाव दिसून येण्याची शक्यता असल्याने प्रतिबंधात्मक उपाययोजना म्हणून करपा रोगाच्या नियंत्रणासाठी कार्बेन्डॅझिम १२% + मन्कोझेब ६३% या संयुक्त बुरशीनाशकाची १० ग्रॅम प्रति १० लिटर पाण्यात मिसळून फवारणी करावी. |
| **कळीमिरी** | **काढणी अवस्था** | ➕ काळी मिरीच्या घोसातील एक दोन दाणे पिवळे किंवा तांबडे झाल्यास मिरीची काढणी करावी, नंतर बांबूच्या करंडीत किंवा मलमलच्या कापडात भरून उकळत्या पाण्यात एक मिनीट बुडवावे व उन्हामध्ये ३ ते ४ दिवस चांगले वाळवावे. |
| **मोगरा** | **वाढीची अवस्था** | ➕ मोगरा फूल पिकावर मिज माशीचा प्रादुर्भाव दिसून आल्यास लॅबडासायलोथ्रिन ०.५ मिली प्रति लिटर पाण्यात मिसळून फवारणी करावी. तसेच मिज माशीचा प्रादुर्भाव टाळण्यासाठी पिवळ्या रंगाचे चिकट सापळे एकरी २५ या प्रमाणात शेतात लावावे. |
| **वांगी** | **फुलोरा ते फळ धारणा** | ➕ फळ धारणा अवस्थेत असलेल्या वांगी पिकामध्ये शेंडे व फळ पोखरणाऱ्या आळीच्या नियंत्रणासाठी एकरी १० वॉटर ट्रप (water trap) शेतात लावावे. तसेच रस शोषक किडी (मावा, तुडतुडे व पांढरी माशी) च्या नियंत्रणासाठी पिवळ्या रंगाचे चिकट सापळे एकरी २५ ते ३० असे शेतात लावावे. |
| **कलिंगड** | **वाढीची अवस्था** | ➕ नवीन कलिंगड लागवड केली असेल तर पिकाभोवती खुरासणी या पिकाची लागवड करावी जेनेकरून मधमाशया आकर्षित होवून उत्पन वाढण्यास मदत होईल. तसेच पिकावर फळ माशीच्या नियंत्रणासाठी एकरी ४ फळमाशी सापळे शेतात लावावे. |
| **कुकुट पालन** | | ➕ किमान तापमानात घट होत असल्याने रात्रीच्या वेळेस जनावरांच्या गोठयात तसेच कोंबड्यांच्या शेड मध्ये गरजेनुसार विजेचे बल्ब आणि शेडभोवती पडदे गुंडाळावे. |

**सदर कृषि सल्ला पत्रिका गोखले एज्यकेशन सोसायटीचे कृषि विज्ञान केंद्र, कोसबाड हिल येथील तज्ञ समितीच्या शिफारशीनुसार तयार करून प्रसारित करण्यात आली आहे.**

**ई-मेल:kvkkosbad439@gmail.com** **संपर्क:८५५२८८२७१२**

**स्त्रोत**

१) **हवामान पूर्वानुमान : प्रादेशिक हवामान केंद्र , मुंबई**

२) **मागील हवामान : भात संशोधन केंद्र, पालघर**

**ठिकाण : कृषि विज्ञान केंद्र पालघर**

**दिनांक : २५.०१.२०२०**

**स्वाक्षरित**

**प्रमुख अन्वेषक,**

**ग्रामीण कृषि मौसम सेवा - जिल्हा कृषि हवामान केंद्र**

**कृषि विज्ञान केंद्र कोसबाड हिल**